# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २८/०८२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१०) इतिवृत्त**

**सोमवार** दिनांक **२८ ऑगष्ट २००६** रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.रेणुकादास (राजू) वैद्य** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **सकाळी ११.३० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. कावडे साहेबराव राणुबा
2. श्री. गवळी रविकांत काशिनाथ
3. श्री. गायकवाड दिलीप नारायण
4. सौ. दलाल लता श्रीनिवास
5. श्री. पांडे विनायक प्रभाकर
6. श्री. शिरसाट संजय पांडूरंग
7. डॉ. आशा उत्तमराव बिनवडे
8. श्री. दाभाडे हिंमतराव साळूबा
9. श्री. बमणे पुनमचंद सोनाजी
10. श्री. मो. जावेद मो. इसाक
11. श्री. सावंत मधुकर दामोधर
12. श्री. हाजी शेरखान अ. रहेमान

**संवाद :**

श्री.विनायक पांडे : चारपाच दिवसांपुर्वी वर्तमानपत्रात बातमी आली की, महानगरपालिकेचे रस्ते वाहून गेले. विभागप्रमुखांकडून खुलासा घेण्यात यावा की, रस्त्यांचे रजिष्टर ठेवण्यात आले आहे का? रस्त्यांची जाडी किती आहे याची नोंद ठेवण्यात आली आहे का?

सौ.लता दलाल : शहरातील कुठलाही रस्ता असा नाही की, चालताना मानेला झटके बसत नाहीत. अशी दुर्दशा कशामुळे झाली? या कामामध्ये कोण कमी पडले? यापुर्वीच्या स्थायी समिती सभेत रस्त्यांचे रजिष्टर ठेवले जाईल असे सांगण्यात आले होते, ते ठेवण्यात आलेले आहे का? काही वृत्तपत्रामध्ये कडवट प्रतिक्रिया व्यक्त केली. सामना वृत्तपत्रामध्ये रस्ते उंदीर, घुशींनी पोखरले असे छापले आहे. काही ठिकाणी रस्ते वाहून गेले असे छापून आले. सविस्तर खुलासा करावा.

मा. सभापती : शहर अभियंता हे सर्वांचे विभागप्रमुख आहेत. रस्त्यांची दुर्दशा कशी झाली याचा खुलासा करावा.

शहर अभियंता : गेल्या आठवड्यापासून वृत्तपत्रात रस्त्याबाबत बऱ्याच बातम्या प्रसिध्द झालेल्या आहेत. महानगरपालिकेने सुमारे 600 कि.मी.लांबीच्या रस्त्यांची कामे केलेली आहेत. त्यापैकी गेल्या वर्षात सुमारे 90 कि.मी. लांबीचे रस्ते केलेले आहेत. गेल्या वर्षी जी कामे झालेली आहेत, रस्त्याचा ज्या ठिकाणी खोलगट भाग आहे त्या ठिकाणी पाणी

साचले व अशा ठिकाणी खड्डे पडले. तसेच जलवाहिनी, ड्रेनेज कनेक्शन इ.मुळे चऱ्या पडल्या.

सौ.लता दलाल : असे किती कनेक्शन्स आहेत त्याचाही खुलासा करावा. रस्त्यांची कामे करतेवेळी ही कामे का केली नाही?

शहर अभियंता : 600 कि.मी. पैकी 80 ते 90 कि.मी. रस्ते हे यावर्षी केलेले आहेत. बाकीचे पुर्वीच केलेले आहेत. प्रत्येक तिसऱ्या वर्षी रिसरफेसींग करण्यात येते.

सौ.लता दलाल : गेल्या वर्षी किंवा त्याच्या अगोदर जे रस्ते केले ते सुस्थितीत आहेत का? यास जबाबदार कोण? जबाबदारी कोणावर निश्चित करणार? रस्ते खोदल्यावर ताबडतोब दुरूस्तीची जबाबदारी कोणाची आहे?

शहर अभियंता : ड्रेनेजचे काम करतेवेळी निश्चितच खोदावे लागते. खोलगट भागात निश्चितच खराब होतात. वेळोवेळी पॅचवर्क करतो. ही निरंतर प्रक्रीया आहे. जास्त प्रमाणात झालेला पाऊस ह्या गोष्टी घडत असतात.

सौ.लता दलाल : सभागृहाची दिशाभूल होत आहे. आपणच सांगता तीन वर्षांनी सरफेसींग केले जाते. यावर्षी जे 80-90 कि.मी.रस्त्यांचे काम केले, किती ठिकाणी ड्रेनेज, पाणी पुरवठा, इलेक्ट्रीक वायरींगसाठी रस्ते खोदले व कोठे, खर्चासह संपूर्ण माहिती द्यावी.

शहर अभियंता : रजिष्टर ठेवतो, यासंबंधी सविस्तर अहवाल देण्यात येईल.

श्री.हिंमतराव दाभाडे : कोणत्याही प्रभागात रस्ते, ड्रेनेज, गटारीची कामे चालू असतांना प्रशासनाकडून नगरसेवकांना माहिति व कामाचा तपशील देण्यात येत नाही. त्यामुळे ठेकेदार काय काम करतात ते समजत नाही. त्यांची मनमानी चालू असते. यापुढे कोणत्याही ठेकेदाराने काम घेतले तर संबंधीत नगरसेवकांना सविस्तर माहिती देण्यात यावी. वॉर्ड क्र.90 मध्ये गेल्या दोन वर्षापासून कामे प्रलंबीत आहेत. श्री.वाकळे नावाचे ठेकेदार आहेत, निकृष्ट दर्जाचे काम करतात. सहा महिने झाले ड्रेनेजचे, गटारीचे काम आहे.

मा. सभापती : कार्यकारी अभियंता (ड्रेनेज) यांनी खुलासा करावा.

कार्य.अभि.(इड्रेविउ) : कृपया खुलासा सादर करण्यासाठी थोडा अवधी देण्यात यावा. प्रभाग अभियंता व उप अभियंता यांचेकडून माहिती घेवून देण्यात येईल.

श्री.रविकांत गवळी : काही दिवसांपुर्वी वर्तमानपत्रातून छापून आले होते, रस्त्यांचा अहवाल पूर्ण झालेला आहे. त्याबद्दल काय झाले? आताच शहर अभियंता यांनी खुलासा केला की, 90 कि.मी. लांबीचे रस्ते केले. रस्ता केल्यानंतर देखभाल दुरूस्तीसाठी ठेकेदाराची किती दिवस जबाबदारी असते? माझ्या माहितीप्रमाणे तीन वर्षापर्यंत असते.

अति. शहर अभि. : पुर्वी तीन महिने होती, मागील वर्षापासून, कामाच्या तारखेपासून दोन वर्षाची जबाबदारी ठेवतो. दोन वर्षात नैसर्गिकरित्या खराब झाल्यानंतर दुरूस्त करून घेतो. प्रत्येक कामाचे सुरक्षा ठेव म्हणून काही रक्कम राखून ठेवली जाते व नंतर देण्यात येते.

श्री.रविकांत गवळी : डांबरीकरणाच्या खाली रस्ता पोखरण्यात येतो. उंदीर, घुशी रस्ता खराब करतात याबद्दल वस्तुस्थितीची माहिती देण्यात यावी. रस्त्याची कामे कशा पध्दतीने होतात.

अति.शहर अभि. : डांबरीकरण अंतर्गत आता रिसरफेसींग करण्यात येते. खडीकरण पुर्वीच झालेले आहे.

सौ.लता दलाल : तीन वर्षात रस्ता चांगला राहिल, त्यानंतर आपण 21 मी.मी.चे सील कोटींग करतो. ते 30 मीमी. चे दबाईनंतर 21 मीमी. होते. डब्ल्यू.बी.एम., दबाई त्यावर मुरूम व नंतर सिल कोटींग व नंतर डांबरीकरण. सील कोटींग म्हणजेच ब्लॅक टॉपींग(BT) परंतु प्रत्येक प्रस्तावात डांबरीकरण येते. गेल्या वर्षभरात रस्ते दुरूस्ती, सील कोटींग याबद्दल खुलासा करावा.

मा. सभापती : सविस्तर खुलासा अपेक्षीत आहे.

| | |
|---|---|
| अति.शहर अभि. | : उंदीर, घुशी एका कामाचे संदर्भात तो प्रकार झालेला आहे. 40 कामे केली. समर्थनगर येथील एक रस्ता नाला संरक्षित भिंतीला खेटून आहे. नाला संरक्षित भिंत आणि डांबरीकरण यामध्ये सुटलेल्या भागात भिंतीलगत घुशी लागून साईडबर्न पोखरल्याने रस्त्याच्या कडेची बाजू ढासळली. खाद्यासाठी प्राण्यांनी ते पोखरले. साईडबर्न मातीचा आहे त्या ठिकाणी उष्टे खाद्यपदार्थ टाकल्या जातात. त्यामुळे घुशी पोखरतात. आपण रिसरफेसींगचे काम केले होते. |
| श्री.विनायक पांडे | : दरवर्षाचे रेकॉर्ड अद्यावत ठेवले तर कोणतेही काम करा म्हणायची गरज पडणार नाही. संपूर्ण शहराचा अद्यावत रेकॉर्ड असावयास पाहिजे. |
| मा. सभापती | : योग्य प्रकारे अभिलेख ठेवण्यात यावे व सभागृहाला माहिती देण्यात यावी. |
| शहर अभियंता | : रेकॉर्ड ठेवणे सुरू केलेले आहे. |
| श्री.मधुकर सावंत | : शहर अभियंता यांचेकडून तीन हजार रक्कमेच्या वरील सर्व संचिका हाताळल्या जातात. त्यांनी नियोजन का केले नाही? रस्त्याचे कामामध्ये सरफेस गटारचा समावेश करण्यात येतो का. |
| शहर अभियंता | : अंदाजपत्रकामध्ये सरफेस गटारचा समावेश करण्यात येतो. |
| श्री.मधुकर सावंत | : सर्व स.सदस्यांनी सांगावे की, सरफेस ड्रेने कुठे आहे का. |
| शहर अभियंता | : मुख्य रस्त्यासाठी सरफेस गटारची तरतुद आहे. काही ठिकाणी आवश्यकता नसल्याने करण्यात आले नाही. पुर्वीदेखील सरफेस गटार करण्यात आलेल्या आहेत. सरफेस गटार स्वच्छ न झाल्यामुळे प्रश्न उद्भवतो. |
| श्री.संजय शिरसाट | : रेल्वेस्टेशन ते दिल्लीगेट या रस्त्याला साईड गटार आहे का ते दाखवावे. |
| शहर अभियंता | : फुटपाथच्या बाजूला साईड गटार केलेल्या आहेत. |
| श्री.संजय शिरसाट | : माझी विनंती आहे की, सभा तहकूब करावी व आपण सर्वजण पाहणी करून येवू. |
| मा. सभापती | : सभा 30 मिनिटांसाठी तहकूब करण्यात येते. |
| | (दुपारी 12.30 वाजता तहकूब झालेली सभा 1.00 वाजता सुरू झाली.) |
| श्री.विनायक पांडे | : मा.सभापती, आपण स्वतः, शहर अभियंता श्री.सोनी साहेब यांच्यासह स्थळपाहणी केली. क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन या रस्त्यावर कोठेही साईड ड्रेन सापडली नाही. फुटपाथच्या बाजूला साईडड्रेन आहे असे शहर अभियंता यांचे म्हणणे होते. कृपया ते समजून सांगावे. |
| मा. सभापती | : शहर अभियंता यांनी खुलासा करावा. |
| शहर अभियंता | : स्थळ पाहणीचे वेळेस आपण मुख्य रस्ते बघितले. फुटपाथ लगत पाणी जाण्यासाठी अर्धगोलाकार केलेले आहे. रेल्वेस्टेशन ते क्रांतीचौक रस्त्यावर बऱ्याच ठिकाणी आहे. एक-दोन ठिकाणी नाही. गटारीची तरतुद आहे. येथून पुढे जे रस्ते करण्यात येतील ते गटारीसह सादर करता येईल. |
| सौ.लता दलाल | : जाताना सांगितले साईडड्रेन आहे. गटार व साईडड्रेन याचा अर्थ वेगळा निघतो. जाळ्या टाकून पाणी वाहून जाते ती साईडड्रेन, याचा अर्थ गटार असा होत नाही. |
| शहर अभियंता | : फुटपाथच्या बाजूला पाणी जाण्यासाठी व्यवस्था केलेली आहे. थ्रू आऊट गटार नाही. फुटपाथ व रस्त्यावर पाणी साचू नये यासाठी काही ठिकाणी केलेले आहे. |
| सौ.लता दलाल | : कोठे आहे ते दाखवण्यात यावे. योग्य ती माहिती द्यावी. |
| शहर अभियंता | : साईडड्रेन रस्त्यावर पाणी थांबू नये म्हणून फुटपाथच्या बाजूला काढण्यात येते. |
| श्री.मधुकर सावंत | : सभागृहाची दिशाभूल होत आहे. पाणी वाहून जाण्यासाठी ड्रेनेजचा वापर होतो. |
| श्री.संजय शिरसाट | : महानगरपालिका रस्त्यावर बराच खर्च करते. ड्रेनेज, लाईट, रस्ते या सर्वांची जबाबदारी शहर अभियंता यांच्यावर आहे. आपण फक्त दोनच रस्ते पाहिले. 90 |

कि.मी. रस्त्यांची कामे झालेली आहेत. आपण क्रांतीचौक येथे गेलो. साईडड्रेन आणि गटर यांचा फरक सांगता आला नाही. साईडड्रेन रस्त्याच्या कडेला असते व गटारी गल्ल्यात असतात. फुटपाथच्या बाजूला साईडड्रेन दीड ते दोन फुट व त्यावर जाळी असावी. व्हीआपी रस्त्यावर साईडड्रेन मध्ये माती गेली म्हणून सांगण्यात आले. क्रांतीचौक पासून रस्ता पाहण्यात आला, महानगरपालिकेपर्यंत कुठे आहे ते दाखवावे. आपण एमएसआरडीसी कडून रस्ता करून घेतले आहे. त्यांना पैसे देतो. आजही रेल्वेस्टेशन ते क्रांतीचौक या रस्त्यावर साईडड्रेन दाखवावी. अनेक उदाहरणे देता येतील. आपण साईडड्रेन का बांधत नाही. बराच खर्च केला, क्रांतीचौक येथे नुसती कच दिसते.

श्री.विनायक पांडे : कोणता रस्ता केव्हा बांधला व कोणत्या वर्षी किती खर्च झाला, याचा तपशील असायलाच पाहिजे.

श्री.जावेद कुरैशी : रस्त्यावर कोट्यावधीचा खर्च होतो. किती डांबर शहरात आले याचा अंदाज येईल. 8 कोटीचे रस्ते, अडीच कोटीचे डांबर. जकात भरल्याची माहिती घ्यावी सन 2005-06 मध्ये किती डांबर आयात झाले व किती ऑईल आलेले आहे?

श्री.रविकांत गवळी : आपल्याकडे गुणवत्ता चाचणी अस्तित्वात आहे का? असेल तर कुठे आहे. आपण कामामध्ये किती डांबर व किती खडी वापरतो. रस्त्याची जाडी जमीनीच्या खाली किती व जमीनीच्या वरती किती असावी.

शहर अभियंता : सलग गटार कोणत्याही रस्त्यावर नाही. जेथे फुटपाथ केलेले आहे तेथे पाणी जाण्यासाठी साईडड्रेने काढलेली आहे. आता आपण मुख्य रस्त्यावर प्रस्तावित करतो. ढापे व जाळी याची तरतूद करण्यात येते. गुणवत्ता चाचणीसाठी आपण नमुने शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाला पाठवतो. एसजीएस या पुण्याच्या संस्थेला पाठवतो. त्यांचेकडून गुणवत्ता तपासतो. एसजीएस वाले स्वत: जागेवर जावून पाहतात.

सौ.लता दलाल : साईडड्रेन कोठेही नाही, त्यामुळे रस्ते खराब झालेले आहेत. त्याला जबाबदार कोण?

श्री.संजय शिरसाट : मागील एका सर्वसाधारण सभेमध्ये सिमेंटचे रस्ते करा म्हणून प्रस्ताव ठेवला. दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात सिमेंट काँक्रीटच्या गुळगुळीत रस्त्याबाबत बातमी आली. ते नऊ रस्ते माझ्या प्रभागात येत नाही. सिमेंट काँक्रीटच्या रस्त्यापेक्षा डांबरी रस्त्याचे आयुष्यमान फारच कमी आहे. त्यामुळे आपल्या संस्थेचे नाव खराब होते शिवाय रस्तेही खराब होतात. डांबराचा ट्रक दीड-दोन तास उभे ठेवले तर निव्वळ ढेकळे होतात. डांबराऐवजी ऑईल मिक्स होते. शहर अभियंता, अतिरिक्त शहर अभियंता यांनी दिलेला अहवाल मान्य नाही, मा.आयुक्तांनी अहवाल द्यावा.

श्री.जावेद कुरैशी : स.सदस्य श्री.शिरसाट यांच्या मताशी मी सहमत आहे. शहरातील मोठे रस्ते सिमेंट काँक्रीटचे व्हावेत.

मा.सभापती : दीड तासापासून चर्चा होत आहे, स्थळपाहणी करण्यात आली. साईडड्रेन आढळून आले नाही. मोठ्या रस्त्यावर साईडड्रेन असणे आवश्यक करावे. अहवाल माझ याकडे प्राप्त झालेला आहे. मा.आयुक्तांनी स्वत: चौकशी करून दुरूस्तीसाठी जो मागच्या वर्षी खर्च झाला व एक वर्षात रस्ते खराब झाले यासाठी कोण जबाबदार आहे. पुढील सभेमध्ये अहवाल द्यावा.

श्री.रविकांत गवळी : मागील वर्षी भूखंड घोटाळ्या संदर्भात समिती नेमली होती. त्याचा अहवाल अद्याप आलेला नाही. स्पेक कंपनीतर्फे मालमत्ता करांच्या नोटीसा देण्यात आलेल्या आहेत त्यांच्या सुनावणीसाठी तीन महिन्यापुर्वी तीन स्थायी समिती सदस्यांची समितीमध्ये नियुक्ती करण्यात आली होती. त्याबद्दल अद्याप आम्हास कुणी लेखी दिलेले नाही.

सुनावणी चालू आहे. याबद्दल विचारणा केली तर सुनावणी चालू नसल्याचे सांगण्यात येते.

सौ.लता दलाल : गेल्या दीड वर्षापुर्वी 9 अभियंतांना बोगस गुणपत्रिकांच्या संदर्भात निलंबीत केले होते, परत कामावर घेतले. आपल्या महानगरपालिकेमध्ये असे काही कर्मचारी आहेत का, महानगरपालिका सेवेत लागल्यानंतर सेवेचा कालावधी वाढवण्यासाठी जन्मतारखेत बदल केलेला आहे. या संदर्भात काही खोटे पुरावे दाखल केले आहेत का? माहिती द्यावी. मागे 9 अभियंतावर कारवाई केली. जन्मतारखेच्या संदर्भात प्रशासनाने चौकशी करावी. यात जेष्ठ अभियंते आहेत.

उप आयुक्त(म) : जन्मतारखेत बदल या बाबतीत प्रशासनाकडे माहिती नाही. या बाबत पुढील सभेत माहिती देण्यात येईल.

श्री.संजय शिरसाट : 9 अभियंते यांनी बोगस अभिलेख दाखल केले म्हणून त्यांच्या नियुक्त्याबाबत माहिती देण्यात यावी.

सौ.लता दलाल : जन्मतारीख चुकीची दाखवलेली आहे. आता जन्मतारखेत बदल करून सेवा वाढवण्यात आलेली आहे.

श्री.संजय शिरसाट : न्यायालयात प्रकरण असलेल्या चुकीच्या नेमणूकाबाबत माहिती द्यावी.

उप आयुक्त(म) : महानगरपालिकेमध्ये सुमारे 4800 मनपा अधिकारी, कर्मचारी आहेत. सर्वांचा आढावा घेतल्यानंतर खातरजमा करण्यात येईल.

सौ.लता दलाल : किमान वर्ग-1, वर्ग-2 अधिकाऱ्यांची माहिती देण्यात यावी.

उप आयुक्त(म) : याबाबत प्रशासनाकडे माहिती उपलब्ध नाही, पुढील सभेत माहिती देण्यात येईल. नियुक्त्याबाबत जनहित याचिका दाखल झाली. 31 ऑगष्ट पर्यंत महापालिका आयुक्तांना शपथपत्र दाखल करण्याची मुदत दिलेली आहे.

श्री.हिंमतराव दाभाडे : 1124 नोकर भरतीच्या संदर्भातही गोंधळ आढळले. ज्यांचे वय नोकरीच्या वेळी 8-10 वर्ष होते त्यांना नोकरीत घेतले. तेव्हाचे कागदपत्र तपासले तर त्यांचे वय 10 वर्ष होते. कधी भरती करण्यात आले.

मा. सभापती : 1124 नोकर भरती संबंधी कमिटी गठीत केलेली आहे. अहवाल पुढील सभेत येईल. नियुक्त्या, जातीचा दाखला, जन्म दाखला पुढच्या सभेपर्यंत माहिती द्यावी. अधिकारी वर्गापासून सुरू करावे. सविस्तर अहवाल पुढील सभेत द्यावा.

श्री.रविकांत गवळी : मागील सर्वसाधारण सभेत नियुक्त्या संदर्भातील विषय क्र.12 कार्योत्तर मंजूरीसाठी सादर केलेला होता. सर्वसाधारण सभेत कार्योत्तर मंजूरी रद्द केली. त्यांच्या नियुक्त्या रद्द करण्यात आलेल्या आहेत का?

उप आयुक्त (म) : 5 कर्मचाऱ्यांच्या बाबतीत विषय क्र.12 रद्द करण्यात आलेला आहे. ठरावाची प्रत प्राप्त झाल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल. इतिवृत्त कायम झाल्यावर व सत्यप्रत मिळाल्यावर कार्यवाही करता येईल.

श्री.संजय शिरसाट : कारणापुरता उतारा मिळू शकत नाही का? दोन दिवसात घेतले असते तर नियुक्त्या रद्द झाल्या असत्या.

उप आयुक्त(म) : दि.11-8-2006 च्या सर्वसाधारण सभेत पारीत झालेल्या ठराव क्र.12 ची प्रत आज प्राप्त करून घेतली जाईल.

सौ.लता दलाल : मालमत्ता कराच्या सुनावणीच्या संदर्भात तीन स्थायी समिती सदस्यांची समितीवर नियुक्ती झाली. अद्याप एकही बैठक नाही. कर निर्धारक व संकलक यांना विचारले तर मा.आयुक्तांना कमिटी मान्य नाही असे म्हणतात. स्पेक कंपनी काय काम करते. माझ्या समक्ष एका प्रकरणात 17 हजार कर आकारणी केली, कर कमी करण्यासाठी

संबंधीताकडून रक्कमेची मागणी करण्यात येते. 3000 चे 17000 व 17 हजारचे 3 हजार कसे होते? खोटी कामे करतात. खुलासा करण्यात यावा. सुनावणीची माहिती मिळाली नाही. आजही कुठल्याही मिटींगला न बोलावता सुनावणी चालू आहे.

श्री.रविकांत गवळी : आपण स्पेक कंपनीला कायमस्वरूपी ठेवून घेतलेले आहे का? त्यांनीच रक्कमा जमा करायचे व पावती द्यायची.

श्री.जावेद कुरैशी : घरमालकांच्या नावाने मालमत्ता कर लावलेला नाही. स्पेकने नेमलेल्या मुलांनी योग्य सर्व्हे केलेला नाही. मालकांच्या नांवाऐवजी भाडेकरूंची नांवे लावली. 2 खोल्यांचा 17 हजार टॅक्स लावला.

कर नि. व संकलक : मालमत्ता कराच्या सुनावणीसाठी आक्षेप आलेले आहेत. वॉर्ड कार्यालयामार्फत सुनावणी घेण्यात येते. सर्व अभिलेख वॉर्ड कार्यालयात आहेत.

सौ.लता दलाल : आम्ही तिघांनी येऊन सांगितले की सुनावणीच्या वेळी आम्हालाही बोलवावे. कमिटीला अधिकार असू नये असे मा.आयुक्तांना वाटते, असे सांगण्यात येते.

कर निर्धा.व संकलक : मुख्य कार्यालयात सुनावणी घेण्यापेक्षा वॉर्ड कार्यालयात संयुक्तीक राहिल. वॉर्डातील सुनावणीच्या तारखा देतो. सुनावणीचे तक्ते पुरविण्याच्या सूचना दिल्या आहेत.

श्री.रविकांत गवळी : सुनावणीसाठी सदस्य का नाही. कधी बोलावण्यात आले. स्पेकला किती वेळा मुदतवाढ दिली, त्याचे कारण काय आहे. महानगरपालिका किती फायद्यात आहे.

सौ.लता दलाल : 2003 पासून स्पेक कंपनीस काम दिलेले आहे. महानगरपालिकेचा किती फायदा झाला? सहा महिन्यासाठी दिले होते. मुदतवाढ दिली, कारण काय आहे?

कर निर्धा.व संकलक : वॉर्ड कार्यालयातील सुनावणीच्या आगाऊ तारखा कळविण्यात येतील. स्पेक कंपनीस सर्वेक्षणासाठी सहा महिन्यासाठी मुदत होती ती 31 डिसेंबर 2004 पर्यंत वाढवली. मुदतीनंतर प्रति दिवस 5000 रूपये दंड आकारण्याची तरतूद आहे. आता काम शेवटच्या टप्प्यात असून फेब्रुवारी 2006 पर्यंत मुदत दिली होती.

सौ.लता दलाल : रू.5000/- दंड किती दिवस आकारण्यात आला? मुदतवाढ देण्यात आली, हा निर्णय मा.आयुक्तांचा आहे. स्थायी समितीपुढे का आणला नाही?

कर निर्धा.व संकलक : 57 लाखांचा दंड होईल. हा करार 2-3 कोटीचा आहे.

श्री.संजय शिरसाट : आपणास 30-40 कोटी फुगवून सांगीतले. माझ्या वॉर्डात एक सदनिका आहे, पहिल्या मजल्यास 3 हजार, दुसरा मजला 4 हजार, तिसरा मजला 5 हजार अशा प्रमाणे आकारणी झाली. सदनिका मधील गॅलरी देखील घेण्यात आली. प्रत्येकाला सुनावणीसाठी बोलावले 30 तारखेला या. एका दिवसात 200-300 लोकांना बोलावले. सुनावणीसाठी जर एकास 15 मिनिटे दिली तर तेवढ्या सुनावणी घेणे शक्य नाही. वॉर्ड कार्यालयात गेले तरी अडचणच, जनता दरवार घेतला, वॉर्ड ऑफीसरला वाटले तर कमी. माझ्या वॉर्डात 100% कर भरणारे नागरीक आहेत त्यांनी करायचे काय? जोपर्यंत योग्य निर्णय होत नाही तोपर्यंत ते कर भरणार नाही. स्पेक कंपनीचे लोक योग्य प्रकारे बोलत नाही, वर्तन करीत नाही. त्यांना काही मिळाल्यावरच कमी करतात. स्वातंत्र्य सैनिकांनी निवेदन दिले. झोनमध्ये बसू नाका, वॉर्डात जनता दरबार घ्यावे.

श्री.रविकांत गवळी : सदर कंपनीस फेब्रुवारी 2006 पर्यंत दिलेली मुदतवाढही संपलेली आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाची कंपनी आहे हे खरे आहे का? कंपनीस एकदा भेट देण्यात यावी.

मा. सभापती : तपासणी करून घ्यायला हरकत नाही.

सौ.लता दलाल : फेब्रुवारी 2006 ही मुदत कोणी ठरवली?

कर निर्धा.व संकलक : आपण त्यांना फक्त 35 लाख दिले. दंडाची वसूली नाही. जानेवारी 2005 पासून प्रति दिवस 5 हजार रूपये दंड, दीड लाख रूपये प्रति महिन्याला दंड होतो.

| | |
|---|---|
| सौ.लता दलाल | : 70 लाख रूपये कमी करणार का? |
| कर निर्धा.व संकलक | : मुदतवाढीसाठी दंड नाही. गेल्या वर्षभरात त्यांना काही रक्कमा दिल्या नाही. |
| सौ.लता दलाल | : त्यांनी सहा महिन्यात दिले का. डिसेंबर 2004 पर्यंत मुदतवाढ होती. फेब्रुवारी 2006 पर्यंत मुदतवाढ कोणत्या निकषाने देण्यात आली? |
| कर निर्धा.व संकलक | : सर्व्हेचे काम पूर्ण झालेले आहे. आपण त्यांना पैसे दिलेले नाही. |
| सौ.लता दलाल | : त्यांना पेमेंट झाले नाही तर त्यांनी कोर्टात जावे. त्यांनी दाखवावे महापालिकेचा फायदा काय झाला. |
| कर निर्धा.व संकलक | : एकूण 88993 नोटीसेस देण्यात आलेल्या आहेत. 10096 आक्षेप आले. सुरेवाडी येथे दिशानगरीत पूर्ण वसूल करण्यात आले. |
| श्री.संजय शिरसाट | : गुलमंडी, राजाबाजार, बन्सीलालनगर या भागाबद्दल सांगावे. स्पेकमुळे थांबलेले आहे. 4500 सुनावणी दिली. 6500 पडून आहेत. |
| सौ.लता दलाल | : स्पेक कंपनीने पुन्हा सर्व्हे केला. पुन्हा नोटीसेस देण्यात आल्या, हरकती आल्या. आजही महानगरपालिकेच्या वॉर्ड कार्यालयात स्पेकचा कर्मचारी 11-12 वाजेपर्यंत येत नाही. महानगरपालिकेचा काय फायदा झाला. |
| कर निर्धा.व संकलक | : सुनावणी व त्यानंतर तडजोड आणि त्यानंतर अतिम डिमांड बील देण्यात येईल. |
| सौ.लता दलाल | : सहा महिन्याचे अडीच वर्ष झाले, सुनावणी होत नाही. मग मुदतवाढ का दिली? |
| श्री.हिंमतराव दाभाडे | : स्पेक कंपनीकडे मॅटर तयार आहे. झोपडपट्टी व कॉलनीसाठी सारखाच दर. झोपडपट्टीत 10-12 हजार रूपये टॅक्स आकारला जातो. त्यामुळे जनतेला त्रास होतो. झोपडपट्टीसाठी वेगळा व कॉलनीसाठी वेगळा दर असावा. |
| मा. सभापती | : तीन सदस्यांची समिती नेमली, सुनावणीच्या तारखा समितीच्या सदस्यांना कळविण्यात याव्यात. त्यांच्या उपस्थितीत सुनावणी घेणे आवश्यक आहे. त्वरीत कार्यवाही व्हावी. |
| श्री.हिंमतराव दाभाडे | : मुथीयान कॉर्नर येथे माधवराव घोरपडे प्रकरणातील कागदपत्रे उपलब्ध झाली किंवा नाही? |
| उप आयुक्त(म) | : सर्व संचिका उप आयुक्त(म) यांच्याकडे आल्या आहेत. छाननीसाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली. त्यांनी काम करण्यास नकार दिला. ते नगर रचना विभागामध्ये आता नसल्याने दुसरा कर्मचारी नेमावे असे सांगितले. |
| श्री.संजय शिरसाट | : घोरपडेने अतिक्रमण केले का. |
| श्री.पुनमचंद बमणे | : खामनदी येथील अतिक्रमण बाबत काय कारवाई केली? |
| उप आयुक्त(म) | : बाधीत घरांचे सर्व्हे बाबत नगर भूमापन कार्यालयाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. |
| श्री.पुनमचंद बमणे | : पुरामध्ये वाहून गेल्यानंतर एक व्यक्ती मरण पावली त्यांना 11000/- ची आर्थिक मदत देणार आहोत. कार्यवाही कधी पूर्ण होईल. |
| उप आयुक्त (म) | : अतिक्रमण काढण्यासाठी विहित प्रक्रीया पूर्ण केल्याशिवाय काढता येत नाही. |
| मा. सभापती | : जी काही प्रक्रीया आहे ती पूर्ण करून अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करावी. |
| श्री.मधुकर सावंत | : महानगरपालिकेचे किती अधिकारी/कर्मचारी यांना मोबाईल व लँडलाईन दिलेले आहेत, त्यावर किती खर्च येतो. अत्यावश्यक सेवेतील किती व ऑफीसमधील किती, माहिती द्यावी. लाईट, ड्रेनेज विभागास फोन केला असता कुणी सापडत नाही. महानगरपालिका तिजोरीवर किती भार पडतो. |
| मा. सभापती | : पुढील सभेत माहिती द्यावी. |

**विषय क्र.84 :**

दिनांक 23.2.06(का.प.क्र.25), 1.3.06(का.प.क्र.26), 7.3.06(का.प.क्र.27), 10.3.06(का.प.क्र.28), 16व17-3-06(का.प.क्र.29), 22.3.06(का.प.क्र.30), 28.3.06(का.प.क्र.31), 31.3.06(का.प.क्र.32) व **16/8/2006**(का.प.क्र.**9**) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.रविकांत गवळी : मागील बऱ्याच सभांचे इतिवृत्त कायम करण्यासाठी आलेले आहे. या सभेत जे विषय मंजूर झालेले आहेत त्याची अंमलबजावणी केली नाही का.

श्री.मो.जावेद मो.इसाक : मनपामध्ये विविध ५७ पदांच्या भरतीसाठी परीक्षा घेण्यात आल्या, त्यात धरणग्रस्तांचा समावेश करण्यात आलेला नाही. मा.जिल्हाधिकारी यांचेकडून ९ दिवस अगोदरच यादी महापालिकेस प्राप्त झालेली होती. मागच्या बैठकीत संबंधीत अधिकाऱ्यांनी खुलासा केला की, दोन दिवस मिळाले होते म्हणून कार्यवाही करता आली नाही. माझी अशी विनंती आहे की, पुन्हा या ५७ पदांसाठी परीक्षा घेण्यात याव्यात. धरणग्रस्तांचा जो हक्क होता तो त्यांना मिळालेला नाही.

मा. सभापती : आपण जे मत व्यक्त केले त्याच्याशी सर्व स.सदस्य सहमत आहेत. या संदर्भात मी स्वतः मा.आयुक्तांना पत्र दिलेले आहे. आपण जो मुद्दा मांडला त्याचा उल्लेख त्यात केलेला आहे. या संदर्भात एक दोन दिवसात खुलासा येईल, त्याची प्रत आपणांस देखील देण्यात येईल.

श्री.मो.जावेद मो.इसाक : दि.१६-८-२००६ च्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तातील विषय क्र.६८ मध्ये एल.के.कन्स्ट्रक्शन यांना काम दिलेले आहे. या संदर्भात त्यांचेवर गुन्हा दाखल केलेला नाही, चौकशी चालू आहे. करीता त्यांना काम देण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता द्यावी.

मा. सभापती : स.सदस्यांचे म्हणण्यानुसार एल.के.कन्स्ट्रक्शन या एजन्सीवर फक्त तक्रार दाखल झाली असेल व त्यांच्यावर लावण्यात आलेले आरोप सिध्द झालेले नसतील तर मा.न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून त्यांना काम देण्यास हरकत नाही.

श्री.संजय शिरसाट : कोहीनूर प्लाझा संदर्भात मागील बैठकीत मुद्दा मांडला होता, अद्याप कार्यवाही केलेली नाही. तसेच त्याचे बाजूला एका प्लॉटवर फ्लोटींग एफ.एस.आय. २० हजार चौरस फुट दिलेला आहे. याचा खुलासा व्हावा.

मा. सभापती : या संबंधीची माहिती पुढील बैठकीत उप आयुक्त (महसूल) यांनी द्यावी.

श्री.रविकांत गवळी : बायजीपुरा गल्ली क्र.८ मध्ये महापालिकेची एक जागा आहे. १० महिन्यापुर्वी ठराव झाला. व्यायाम शाळेसाठी ती जागा ७५००/- रूपये प्रमाणे भाड्याने दिलेली आहे. आतापर्यंत भाडे वसुल केलेले नाही. ७५ हजार रूपये महानगरपालिकेचे मिळालेले नाहीत.

मा. सभापती : कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. लवकरच कार्यवाही होईल. दुरूस्त्यांसह इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

दिनांक 23.2.06(का.प.क्र.25), 1.3.06(का.प.क्र.26), 7.3.06(का.प.क्र.27), 10.3.06(का.प.क्र.28), 16व17-3-06(का.प.क्र.29), 22.3.06(का.प.क्र.30), 28.3.06(का.प.क्र.31), 31.3.06(का.प.क्र.32) व **16/8/2006**(का.प.क्र.**9**) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे दुरूस्त्यांसह इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.85 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.55 कैसर कॉलनी अंतर्गत रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणेच्या कामाचे सा.बां.विभगाच्या सन 2005-06 च्या दरसूचीनुसार र.रू.10,00,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च 2006-07 या आर्थिक वर्षात शहरी भागात पुनःडांबरीकरण या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. प्रस्तुत अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारस केली आहे व मा.स्थायी समिती समोर सादर करण्याचे आदेशित केले आहे. तरी र.रू.10,00,000/-चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.55 कैसर कॉलनी अंतर्गत रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू. 10,00,000/-चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.86 :**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मौजे कोतवालपुरा येथील न.भू.क्र.2340/पैकी भूखंड क्र.40 औरंगाबाद नगर परिषदेने जाहीर लिलावाद्वारे सन 1969 मध्ये श्री.गोवर्धन बलदवा यांना विक्री केलेले आहे.

सदर भूखंड श्री.मदनलाल पिता मोतीलाल लाहोटी यांनी सन 1981 मध्ये गोवर्धन बलदवा यांच्याकडून रू.30,000/- (तीस हजार रूपये) मध्ये खरेदी केलेले आहे. सदरील भूखंडाचे क्षेत्र 60 फुट x72 फुट(4320 चौ.फुट) आहे. यापैकी 60फुट x 20फुट औरंगाबाद नगर परिषदेने सन 1981 मध्येच रस्त्याचा विकास करतेवेळी घेतलेले आहे. सदर जागेचा म्हणजेच 60'x20' जागेचा मोबदला मागणी करून मा.उच्च न्यायालयात आर.सी.एस.नंबर 3086/93 श्री.मदनलाल पिता मोतीलाल लाहोटी विरूध्द महानगरपालिका औरंगाबाद दावा दाखल केलेला आहे. सदर दाव्याच्या अनुषंगाने महानगरपालिकेचे पॅनलवरील वकील श्री.एच.टी.जोशी यांना मिळकतधारकाने सदर प्लॉट 60'x20' रूपये 30,000/- मध्ये घेतलेले आहे. म्हणजेच रूपये 6.94 प्रति चौ.फुट दर होतो. त्यानुसार मा.स्थायी समिती, महानगरपालिका औरंगाबाद यांचेकडे प्रस्ताव सादर करून मोबदला देणे बाबत प्रस्ताव सादर करण्यात येईल, असे मा.उच्च न्यायालयासमोर बाजू मांडावी असे जा.क्र.मनपा/नरवि/ससंनर/भूसं/1799/05 दिनांक 16-9-2005 अन्वये कळविण्यात आले.

सबब प्रकरणात वरील दराप्रमाणे मोबदला दिला गेला नाही त्यामुळे मा.उच्च न्यायालयाचा अवमान होईल. करीता औरंगाबाद नगर परिषदेने 60फुट x 20फुट (1200 चौ.फुट) रस्त्यासाठी घेतलेले आहे. म्हणुन 1200 चौ.फुट x 6.94 = 8328.0 म्हणजेच 8328/- रूपये (आठ हजार तीनशे अठ्ठावीस रूपये) मा.उच्च न्यायालयात जमा करणेबाबत वरीलप्रमाणे प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मौजे कोतवालपुरा येथील न.भू.क्र.2340/पैकी भूखंड क्र.40 च्या संदर्भातील मा.उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या आर.सी.एस.नंबर 3086/93 श्री.मदनलाल पिता मोतीलाल लाहोटी विरूध्द महानगरपालिका औरंगाबाद या प्रकरणी औरंगाबाद नगर परिषदेने 60फुट x 20फुट (1200 चौ.फुट) रस्त्यासाठी घेतलेल्या जागेचा मोबदला देण्यासाठी रक्कम रू.8328/- (आठ हजार तीनशे अठ्ठावीस रूपये) मा.उच्च न्यायालयात जमा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.87 :**

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.आंबेडकरनगर एन-6 सिडको, येथील स्मशानभूमी लगत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या रेखांकनातील दोन भूखंड अनुक्रमे क्र.J-1/1 क्षेत्र 612 चौ.मी. व भूखंड क्रमांक J-1/2 क्षेत्र 650 चौ.मी. असून (एकत्रित क्षेत्र 1272 चौ.मी.) या ठिकाणी या वार्डाचे स.नगरसेवक यांचे विनंतीनुसार व तेथील जनतेची गरज लक्षात घेऊन या ठिकाणी महानगरपालिकेचे आरोग्य केंद्र व दुकान केंद्र बांधणे गरजेचे वाटते.

त्यास्तव मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, कार्यालय औरंगाबाद यांना नगर रचना विभाग, महानगरपालिका आरंगाबाद यांचेकडून सदर भूखंड महानगरपालिकेसाठी संपादन करणेसाठी येणाऱ्या खर्चाबाबत पत्रान्वये विचारणा करण्यात आली होती. त्यांनी सदरील भूखंडाचे एकत्रित मुल्य रूपये 13,90,724/- एवढे कळविले असून या व्यतिरिक्त भूखंड नोंदणीकृत पध्दतीने खरेदी करणेसाठी मुद्रांक शुल्क अंदाजे रूपये 85,000/-असा एकूण खर्च रूपये 14,75,724/- अपेक्षित आहे.

सदरील भूखंड महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून खरेदी केल्यानंतर येथे बांधा वापरा व हस्तांतर करा या तत्वावर आरोग्य केंद्र व दुकान केंद्र बांधण्याचा कार्यालयाचा मानस आहे. जेणे करून भूखंड खरेदीसाठी महानगरपालिकेचे खर्ची पडलेले रूपये 14,75,724/- वसुल होईल व या ठिकाणी बांधण्यात येणारे आरोग्य केंद्र पूर्णतः व दुकान केंद्राचा काही भाग महानगरपालिकेस विनामुल्य कोणतीही गुंतवणूक न करता प्राप्त होईल.

उक्त नमुद प्रमाणे आवश्यकता लक्षात घेता प्रकरणास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून अंतिम मान्यतेसाठी व खर्चास मान्यतेसाठी मा.स्थायी समिती सभेसमोर प्रस्ताव सादर करण्यात येतो.

करीता एकुण खर्च रूपये 14,75,724/- च्या खर्चाच्या प्रस्तावास मंजुरी प्रदान करावी त्यास्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.संजय शिरसाट : आपण जागा संपादन करतो, एमआयडीसी कडून विकत घेतलेली आहे. हे लोकांना कळाल्यावर अतिक्रमण होते. ताबडतोब या जागेला कंपाऊंड करून घेण्यात यावे. नियम 5(2)(2) अन्वये सदर काम तातडीने करण्यात यावे.

मा. सभापती : प्रस्ताव मंजूर करण्यात येतो. संरक्षित भिंत त्वरीत बांधावी त्यास 5(2)(2) नुसार काम करून घेण्यास मंजूरी देण्यात येते.

श्री.हिंमतराव दाभाडे : आंबेडकरनगर जवळ नाथा हिवराळे हे न्यायालयात गेलेले आहेत.

विधी सल्लागार : नाथा हिवराळे यांच्या बाजूने कोणताही निर्णय झालेला नाही.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.आंबेडकरनगर एन-6 सिडको, येथील स्मशानभूमी लगत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या रेखांकनातील दोन भूखंड अनुक्रमे क्र.J-1/1 क्षेत्र 612 चौ.मी. व भूखंड क्रमांक J-1/2 क्षेत्र 650 चौ.मी. असून (एकत्रित क्षेत्र 1272 चौ.मी.) या जागेवर आरोग्य केंद्र व दुकान केंद्र बांधणेकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, कार्यालय औरंगाबाद यांचेकडून सदर भूखंड संपादन करण्याकरीता लागणाऱ्या रक्कम रूपये 13,90,724/- च्या खर्चास व सदर भूखंड नोंदणीकृत पध्दतीने खरेदी करणेसाठी मुद्रांक शुल्क अंदाजे रूपये 85,000/-असा एकूण खर्च रूपये 14,75,724/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.88 :</u>**

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, प्रभाग 'ड' साठी खाजगीकरणाच्या माध्यमातून घनकचरा व्यवस्थापना करीता निवडणूक प्रभाग निहाय रस्त्याची स्वच्छता व 100% दारोदारी (डोअर-टू-डोअर) घनकचरा गोळा करण्यासाठी दि.31-7-2006 रोजी स्थानिक व राज्यस्तरीय वर्तमानपत्रामधून फेरनिविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली होती. दिनांक 3.8.2006 ते 14.8.2006 या कालावधीत निविदा विक्री करण्यात आल्या तसेच दि.14.8.2006 रोजी निविदा स्विकृती करण्यात आल्या. त्यात साफसफाईसाठी नऊ निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी एक निविदा धारकाने निविदा अटी व शर्तीचे पालन न केल्यामुळे अपात्र ठरविण्यात आली. तसेच घरोघरी जाऊन घनकचरा गोळा करण्यासाठी सात निविदा प्राप्त झाल्या. यापैकी एक निविदा धारकाने निविदेतील अटींची पुर्तता न केल्यामुळे त्याची निविदा अपात्र ठरविण्यात आली.

वॉर्ड **'ड'** प्रभागात सध्या दररोज 60 मेट्रीक टन कचरा तयार होतो. त्याच्या नियंत्रणासाठी घनकचरा व्यवस्थापनाचे विकेंद्रीकरण करून वॉर्ड-**ड** विभागाचे **अ/ब/क** असे 3 प्रभाग करण्यात आले आहेत.

**<u>नियोजनाचे ठळक वैशिष्ट्ये :</u>**

1. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या सूचना तसेच घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम 2000 ची अंमलबजावणी.
2. आठवड्याचे सातही दिवस तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी झाडलोट व साफसफाईचे काम सुरू राहणार.
3. बाजारपेठ येथील रस्ते दिवसा 2 पाळीत व रात्रपाळीत असे 3 पाळ्यांमध्ये दिवसरात्र स्वच्छ ठेवणे.
4. कामात सुसूत्रता यावी म्हणून वॉर्ड-ड प्रभागाचे अ, ब, क या विभागात साफसफाईसाठी व डोअर-टू-डोअर कलेकशनसाठी विभाजन करण्यात आले आहे.
5. घरोघरी जाऊन कचरा गोळा करण्यासाठी प्रथमच तीनचाकी सायकल व ऑटोरिक्शाच्या वापराचे नियेजन.
6. प्रत्येक कंत्राटदारास प्रभागात तक्रार केंद्र ठेवणे बंधनकारक.

**<u>कामाचे स्वरूप :</u>**

**(अ)** निवडणूक प्रभाग निहाय रस्त्यांची स्वच्छता (16 प्रभाग)

1. मुख्य रस्ते, व्हीआयपी रस्ते रात्रपाळीत झाडणे व स्वच्छ करणे.
2. प्रभाग निहाय रात्रपाळीत स्वच्छ केलेले मुख्य रस्ते व व्हीआयपी रस्त्यांची स्वच्छता दिवस पाळीत टिकवून ठेवणे.
3. प्रभाग निहाय अंतर्गतरस्ते, छोटे रस्ते यांची दिवस पाळीत झाडलोट व साफसफाई करणे.
4. रस्त्यांच्या कडेचे लीटर बीन्स स्वच्छ करणे.
5. बाजारपेठ रस्ते दिवसा 2 पाळीत व रात्रपाळीत असे सलग 3 पाळ्यांमध्ये दिवसरात्र स्वच्छ ठेवणे.

**(ब)** 100% घरामधून, फ्लॅटस् मधून, कमर्शीयल कॉम्प्लेक्स मधून, दुकानामधून म्हणजेच दारादारामधून जागीच वर्गीकरण केलेला ओला व सुका कचरा गोळा करणे.

प्रत्येक प्रभागाचे सफाईमजूर व डोअर-टू-डोअर घनकचरा गोळा करण्यासाठी वाहनांची संख्या मा.उच्च न्यायालय व घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम 2000 या नुसार पुर्व निश्चित करण्यात आलेली आहे. वाहनांची व मजुरांची संख्या निश्चित असल्याने प्रत्येक प्रभागासाठी आवश्यक खर्च निश्चित करण्यात आलेला असुन कंत्राटदाराने फक्त त्यांच्या मेहनतानाची बोली लावलेली आहे.

महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या निकषप्रमाणे ही सेवा प्रदान करणाऱ्या खाजगी कंत्राटदारास त्यांना नेमून दिलेले काम 100% पुर्ण झाल्यानंतर व कामाचे मुल्यमापन झाल्यानंतर देयके अदा करण्यात येणार आहे यामुळे वार्ड 'ड' या विभागात संपूर्ण स्वच्छता पाळली जाईल. खाजगी कंत्राटदाराचे काम समाधानकारक नसल्यास रु.500/- पर्यंत प्रतिदिन दंड आकारण्यात येईल व आवश्यक मजुर संख्या आढळून न आल्यास प्रति मजुर प्रति दिन रु.200/- प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

दिनांक 22.08.06 रोजी झालेल्या वाटाघाटी नंतर विभाग निहाय तुलनात्मक तक्ता सर्वात कमी बोली लावलेला तक्ता खालील प्रमाणे आहे.

**वार्ड-ड प्रभागातील साफसफाई**

| प्रभाग क्र. | एकूण लेबर | प्रभागाची किंमत प्रतिमाह | प्राप्त निविदा | अपात्र | पात्र | पात्र ठरलेल्या सर्वात कमी बोली लावलेल्या कंत्राटदारांचे नांव व बोली रक्कम | कंत्राटदाराची बोली रक्कम धरुन प्रभागाची प्रतिमाह किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | 63 | 2,89,916/- | 02 | - | 02 | ईश्वरलाल खरे<br>(16% जास्त)<br>रु. 46,386/- | रु.3,36,302/- |
| ब | 76 | 3,48,701/- | 07 | 01 | 06 | मोना लेबर<br>(12.90% जास्त)<br>रु. 44,982/- | रु.3,93,683/- |
| क | 71 | 3,27,096/- | 02 | - | 02 | सेंटर फॉर डेव्हलपमेंट<br>(16% जास्त)<br>रु. 52,335/- | रु.3,79,431/- |
| एकुण | | | | | | | रु.11,09,416/- |

**वार्ड-ड प्रभागातील डोअर-टू-डोअर कलेक्शन**

| प्रभाग क्र. | एकूण लेबर | प्रभागाची किंमत प्रतिमाह | प्राप्त निविदा | अपात्र | पात्र | पात्र ठरलेल्या सर्वात कमी बोली लावलेल्या कंत्राटदारांचे नांव व बोली रक्कम | कंत्राटदाराची बोली रक्कम धरुन प्रभागाची प्रतिमाह किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | 51 | 2,55,646/- | 02 | - | 02 | जागृती एंटरप्राईजेस<br>(18% जास्त)<br>रु. 46,016/- | रु.3,01,662/- |
| ब | 41 | 2,02,422/- | 03 | 01 | 02 | मोना लेबर<br>(12.95% जास्त)<br>रु. 26,213/- | रु.2,28,635/- |
| क | 52 | 2,58,168/- | 02 | - | 01 | जागृती एंटरप्राईजेस<br>(18% जास्त)<br>रु. 46,470/- | रु.3,04,638/- |
| एकुण | | | | | | | रु.8,34,935/- |

1) साफसफाईची प्रतिमाह येणारा तीन प्रभागाचा खर्च :- रु. 11,09,416/-

2) डोअर-टू-डोअर कलेक्शनसाठी प्रतिमाह येणारा तीन प्रभागाचा खर्च :- रु. 8,34,935/-

एकुण खर्च :- रु. 19,44,351/-

**साफसफाई व डोअर-टू-डोअर कलेक्शन साठी येणारा खर्च**

| | साफसफाईसाठी (तिन्ही प्रभागाचा) | डोअर-टू-डोअर कलेक्शनसाठी (तिन्ही प्रभागाचा) |
|---|---|---|
| प्रतिमाह | रु.11,09,416/- | रु.8,34,935/- |
| प्रतिवर्ष | रु.1,33,12,992/- | रु.1,00,19,220/- |
| प्रति 3 वर्ष | रु.3,99,38,976/- | रु.3,00,57,660/- |

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.रविकांत गवळी : चार पाच महिन्यापुर्वी अशाच प्रकारे सिडको भागात डोअर टू डोअर कचरा गोळा करण्याची योजना सुरू केली होती. त्या योजनेची अंमलबजावणी 100% चालू आहे का, याचा खुलासा करावा. दोन तीन वेळा स्मरण करून देखील कचरा उचलला नाही तर त्यांचे पेमेंट थांबवण्यात यावे.

आरोग्य वैद्य.अधि. : सिडको भागात 100% डोअर टू डोअर कचरा गोळा करण्या संदर्भात संबंधीत एजन्सीला आदेश दिलेले होते. काही भागातच त्याची कार्यवाही होत आहे. उर्वरीत भागात ही योजना राबविण्याबाबत नोटीस दिलेली आहे. मुदतीत काम केले नाही तर त्या एजन्सीचा ठेका रद्द केला जाईल.

श्री.रविकांत गवळी : संबंधीत एजन्सीला नोटीस केव्हा दिलेली आहे.

आरोग्य वैद्य.अधि. : संचिका मागवावी लागेल.

श्री.रविकांत गवळी : प्रशासनास दोन तीन वेळेस पत्र देवून माहिती दिलेली आहे. संबंधीत एजन्सीने डोअर टू डोअर कचरा उचलला नाही. असे असतांना त्या एजन्सीला बील अदा करण्यात आले, ते थंबवून ठेवावे.

मा. सभापती : या पध्दतीने ठेकेदार काम करीत असेल तर पेमेंटमध्ये कपात करावी.

डॉ.आशा बिनवडे : पैठणला स्वच्छतेसाठी कर्मचारी पाठवले होते ते मनपाचे होते की खाजगी संस्थेचे होते. कोणत्या एजन्सीचे व किती कर्मचारी होते.

आरोग्य वैद्य.अधि. : पैठणला जे पथक पाठविले ते मा.आयुक्तांच्या मंजुरीने खाजगी एजन्सीकडील 40 मजूर पाठविण्यात आले होते. पैठणचे मुख्याधिकारी यांचा अहवाल आल्यानंतर त्या एजन्सीला बील दिले जाणार आहे. मोना लेबर आणि इतर एजन्सीचे कर्मचारी होते.

डॉ.आशा बिनवडे : याच एजन्सीचे काम सिडको भागात चालू असून तेच लेबर त्यांनी पैठण येथे पाठविले होते का? एका एजन्सीला पुन्हा काम दिले जाणार नाही असे असतांना मोना एजन्सी यांना कशी संधी दिली? सिडकोत 100% काम चालू आहे का, स्वच्छता नाही तर 500/- रूपये दंड व मजुरांची संख्या कमी झाली तर 200/- रूपये प्रति दिवस दंड याप्रमाणे किती वेळा कारवाई झाली, किती दंड वसूल झाला?

आरोग्य वैद्य.अधि. : सिडको येथील लेबर पाठविले नव्हते. त्या व्यतिरिक्त चार पाच कॉन्ट्रॅक्टर्सनी त्यांचेकडे असलेले अतिरिक्त लेबर पाठविले होते. सिडकोच्याच तीन चार एजन्सीचे पाठविले होते.

डॉ.आशा बिनवडे : या कामासाठीच्या निविदेमध्ये असे नमूद केले होते की, एका एजन्सीला पुन्हा काम दिले जाणार नाही असे असतांना मोना एजन्सी यांना कशी संधी दिली? ही एजन्सी सिडको भागात काम करते. या एजन्सीचे सिडकोत 100% काम चालू आहे का, प्रस्तावानुसार जर व्यवस्थित काम केले नाही तर दर दिवशी 500/- रूपये दंड व मजुरांची संख्या कमी झाली तर 200/- रूपये प्रति दिवस दंड आकारणी केली जाईल असे दिलेले आहे. अशा प्रकारची तरतूद सिडकोच्या साफसफाईच्या संदर्भात असेल. सिउको भागात गेल्या सहा महिन्यापासून सफाइ्रचे काम करून घेत आहोत. याप्रमाणे किती वेळा कारवाई झाली, किती दंड वसूल झाला? या एजन्सीच्या बाबतीत तक्रारी आलेल्या आहेत काय व त्यानुसार कार्यवाही केली आहे का?

आरोग्य वैद्य.अधि. : सध्या माझ्याकडे माहिती नाही. सिडकोची माहिती मागवावी लागेल.

मा. सभापती : असे निदर्शनास आणलेले आहे की, निविदेतील अटीप्रमाणे एका एजन्सीला एकच काम द्यावे. सिडकोत काम व्यवस्थित होते का त्याची तपासणी करावी. सर्व गोष्टींचा तपास करावा. मोना एजन्सीच्या संदर्भात तपासणी करून अहवाल देण्यात यावा. विषय क्र.88 मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग 'ड' साठी खाजगीकरणाच्या माध्यमातून घनकचरा व्यवस्थापना करीता निवडणूक प्रभाग निहाय रस्त्याची स्वच्छता व 100% दारोदारी (डोअर-टू-डोअर) घनकचरा गोळा करण्यासाठी प्राप्त झालेल्या पात्र असलेल्या निविदांपैकी प्रस्तावातील अटी-शर्तीस अधीन राहून, खाली दर्शविल्यानुसार प्रभाग निहाय कमी तुलनात्मकदृष्टया कमी दराच्या निविदा स्विकारणेस व त्यांचे नांवापुढील बोली रक्कमेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**वार्ड-ड प्रभागातील साफसफाई**

| प्रभाग क्र. | एकुण लेबर | प्रभागाची किंमत प्रतिमाह | प्राप्त निविदा | अपात्र | पात्र | पात्र ठरलेल्या सर्वात कमी बोली लावलेल्या कंत्राटदारांचे नांव व बोली रक्कम | कंत्राटदाराची बोली रक्कम धरुन प्रभागाची प्रतिमाह किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | 63 | 2,89,916/- | 02 | - | 02 | ईश्वरलाल खरे (16% जास्त) रु. 46,386/- | रु.3,36,302/- |
| ब | 76 | 3,48,701/- | 07 | 01 | 06 | मोना लेबर (12.90% जास्त) रु. 44,982/- | रु.3,93,683/- |
| क | 71 | 3,27,096/- | 02 | - | 02 | सेंटर फॉर डेव्हलपमेंट (16% जास्त) रु. 52,335/- | रु.3,79,431/- |
| | | | | | | एकुण | रु.11,09,416/- |

**वार्ड-ड प्रभागातील डोअर-टू-डोअर कलेक्शन**

| प्रभाग क्र. | एकुण लेबर | प्रभागाची किंमत प्रतिमाह | प्राप्त निविदा | अपात्र | पात्र | पात्र ठरलेल्या सर्वात कमी बोली लावलेल्या कंत्राटदारांचे नांव व बोली रक्कम | कंत्राटदाराची बोली रक्कम धरुन प्रभागाची प्रतिमाह किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | 51 | 2,55,646/- | 02 | - | 02 | जागृती एंटरप्राईजेस (18% जास्त) रु. 46,016/- | रु. 3,01,662/- |
| ब | 41 | 2,02,422/- | 03 | 01 | 02 | मोना लेबर (12.95% जास्त) रु. 26,213/- | रु. 2,28,635/- |
| क | 52 | 2,58,168/- | 02 | - | 01 | जागृती एंटरप्राईजेस (18% जास्त) रु. 46,470/- | रु. 3,04,638/- |
| एकुण | | | | | | | रु. 8,34,935/- |

1) साफसफाईची प्रतिमाह येणारा तीन प्रभागाचा खर्च :- रु. 11,09,416/-
2) डोअर-टू-डोअर कलेक्शनसाठी प्रतिमाह येणारा तीन प्रभागाचा खर्च :- रु. 8,34,935/-

एकुण खर्च :- रु. 19,44,351/-

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.89 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.जालाननगर या मंजूर रेखांकना अंतर्गत रस्त्यांचे खडीकरण व पुनःर्डांबरीकरण करणेच्या कामाचे रक्कम रू.17,36,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास प्रशासकीय मान्यता झालेली आहे.

सदर कामासाठी अर्थसंकल्प 2006-07 मध्ये पान क्र.W-120 अ.क्र.22 नुसार रू.15.00 लक्षची तरतुद उपलब्ध असून उर्वरीत तरतुद मा.सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र.277/5 दि.19.6.2006 च्या मान्यतेनुसार मो.राहुलनगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे रू.2.50 लक्ष चे काम रद्द केल्याने उपलब्ध होणाऱ्या तरतुदीतून घेण्यात येत आहे. करीता सदर कामाचे अंदाजपत्रक र.रू.17,36,000/- मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.जालाननगर या मंजूर रेखांकना अंतर्गत रस्त्यांचे खडीकरण व पुनःर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.17,36,000/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.90 :**

मुख्य लेखाधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, सन 2005-06 चे सुधारित व सन 2006-07 चे मुळ अंदाजपत्रक विहित मुदतीत तयार करून सर्व सन्माननीय नगरसेवकांना अंदाजपत्रकांच्या पुस्तिका वाटप करणे आवश्यक असल्यामुळे आणि अंदाजपत्रक छपाई करून घेण्याचे काम तातडीचे असल्यामुळे व विशिष्ट स्वरूपाची असल्या कारणाने अंदाजपत्रकीय पुस्तिका छपाईचे काम, छपाईचे दर मंजुर नसल्यामुळे स्थानिक छपाई धारक मे.श्री उमिया आर्ट प्रिन्टर्स यांच्याकडून करून घेण्यात आलेले असून गतवर्षीचे अर्थसंकल्पीय पुस्तिकाचे दरानुसारच चालु वर्षीच्या अर्थसंकल्पीय पुस्तिकेसाठी छपाई दर देण्यात आलेले आहे. गतवर्षीची अर्थसंकल्प पुस्तिका ही 220 पानी होती व त्यास प्रती पुस्तिका रू.187.50 या दराने देयक अदा करण्यात आलेले होते. त्या दरानुसार चालु आर्थिक वर्षाचे अर्थसंकल्पीय

पुस्तिका 540 पानी असून रू.460/- प्रती पुस्तिका या दराने म्हणजेच गतवर्षीच्या दरानुसारच छपाई करून घेण्यात आलेली आहे. अंदाजपत्रकाच्या एकूण 350 प्रती छपाई केलेल्या असून त्या सर्व सन्माननीय नगरसेवकांना व महानगरपालिकेतील सर्व अधिकारी व विभागास वाटपही करण्यात आलेल्या आहेत. सदर कामासाठी रू.1,67,440/- खर्च आलेला असून खर्चाचे देयक महानगरपालिकेकडे प्राप्त झालेले आहे. खर्चाच्या मान्यतेसाठी मा.स्थायी समितीसमोर प्रस्ताव कार्योत्तर मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन 2005-06 चे सुधारित व सन 2006-07 चे मुळ अंदाजपत्रक पुस्तिका छपाईचे संदर्भाने, रू.460/- प्रती पुस्तिका या दराने 350 प्रती मे.श्री उमिया आर्ट प्रिन्टर्स यांच्याकडून करून घेण्यात आलेल्या छपाईच्या कामासाठी र.रू.1,67,440/- च्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## <u>ऐनवेळचे विषय</u>

**<u>विषय क्र.91 :</u>**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन 2006-2007 या शैक्षणिक वर्षाकरीता मनपा शालेय विद्यार्थ्यांना रेक्झीन शुज, कॅनव्हॉस शुज, पांढरे व रंगीत पायमोजे आणि नेकटाय देय आहेत. त्याकरीता निविदा मागविण्यात आल्या होत्या. एकूण 10 निविदा विक्री झाल्या. पैकी सहा निविदा प्राप्त झाल्या. त्यांची नांवे पुढील प्रमाणे आहेत.

1. मे. अभय ट्रेडर्स, औरंगाबाद.
2. मे.क्रिस्टल रेडीमेडस्, औरंगाबाद.
3. मे. ओके ट्रेडर्स, औरंगाबाद.
4. मे. एमएसएसआयडीसी, औरंगाबाद.
5. मे. रोशन सेल्स कॉर्पोरेशन, औरंगाबाद.
6. मे. शुभम इंडस्ट्रीज, औरंगाबाद.

सदर निविदा धारकांनी दिलेले साहित्याचे नमुनेशासनमान्य प्रयोगशाळा मे.वीरमाता जीजाबाई टेक्नॉलॉजीकल इन्स्टीट्यूट, मुंबई येथे तपासणीकरीता पाठविण्यात आले होते. प्रयोगशाळेचा तपासणी अहवालानुसार सर्वच निविदाधारकांनी दिलेले रेक्झीन शुजचे नमुने दिलेले निकष पूर्ण करीत असल्याचे दिसून येते. कॅनव्हॉस शुज यामध्ये मे.एम.एस.एस.आय.डी.सी. यांनी दिलेला नमुना योग्य नसल्याचे प्रयोगशाळेच्या तपासणी अहवालात नमूद केलेले आहे. त्यामुळे कॅनव्हॉस शुज या साहित्याबाबत संबंधीत एजन्सीचे दर गृहीत धरलेले नाहीत. पांढरे व रंगीत पायमोजे याकरीता प्रयोगशाळेने एकूण तीन निरनिराळ्या चाचण्या घेतल्या आहेत. पैकी पहिल्या दोन चाचण्यांमध्ये मे.ओ.के.ट्रेडर्स व मे.अभय ट्रेडर्स हे दिलेले निकष पूर्ण करीत नाहीत. उर्वरीत निविदाधारकांचे नमुने दिलेले निकष पूर्ण करतात परंतु एकाही निविदा धारकाने दिलेले नमुने हे 100% नायलॉन नाहीत. त्याऐवजी त्यामध्ये सिंथेटीक फायबर हा घटक आढळून आल्याचा प्रयोगशाळेच्या तपासणी अहवालाचा निष्कर्ष आहे. त्यामुळे गणवेश खरेदी करतांना ज्याप्रमाणे कमी दर असणाऱ्या निविदा धारकाकडून हमीपत्र घेऊन निविदा उघडण्यात आल्या त्याच धर्तीवर सदर निविदा उघडल्यावर कमी दर प्राप्त निविदा धारकांकडून 100% नायलॉन पायमोजे देण्याचे हमीपत्र घेण्यात आले आहे. नेकटाय बाबत मे.अभय ट्रेडर्स व मे.ओके ट्रेडर्स हे दिलेले निकष पूर्ण करीत नाहीत. त्यामुळे त्यांचे दर गृहीत धरण्यात आले नाहीत. इतर निविदाधारकांचे नमुने हे दिलेले निकष पूर्ण करतात. वरील साहित्यासाठी प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडला आहे. कृपया अवलोकन व्हावे. तुलनात्मक तक्त्यानुसार रेक्झ ीन शुज व कॅनव्हॉस शुज याकरीता मे.अभय ट्रेडर्स यांचे दर इतरांपेक्षा तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी असून

पांढरे व रंगीत पायमोजे तसेच नेकटाय याकरीता मे.रोशन सेल्स कॉर्पोरेशन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी आहेत.

शिक्षण विभागाने दिलेल्या विद्यार्थी संख्येप्रमाणे एकूण 23188 विद्यार्थ्यांना याचा लाभ देण्यात येईल. याकरीता मान्य दरानुसार एकूण खर्च रक्कम रूपये 29 लक्ष अपेक्षीत आहे. विद्यार्थी संख्येत वाढ झाल्यास खर्चात वाढ होऊ शकते. प्राप्त निविदा दरास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. दि.24-5-2006 रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत ठराव क्र.259/1 अन्वये निविदा अंतिम झाल्यानंतर गणवेश व इतर संलग्न साहित्यासाठी अर्थसंकल्पात ठेवण्यात आलेल्या तरतुदीमध्ये काही प्रमाणात खर्च वाढल्यास, वाढीव खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

याकरीता विद्यार्थी विशेष कल्याण योजने अंतर्गत रू.25 लक्ष एवढी तरतुद ठेवण्यातआलेली आहे. तथापी वाढीव खर्चामुळे रूपये 5 लक्ष अतिरिक्त वाढीव तरतुद उपलब्ध होणे आवश्यक आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.मधुकर सावंत : 15 ऑगष्ट उलटून गेला परंतु अद्याप गणवेश देण्यात आलेले नाही. यानंतर किमान 15 ऑगष्टला गणवेश मिळतील याची दक्षता घ्यावी.

प्र.मुख्य लेखाधिकारी : शालेय गणवेश एक महिन्यात पुरवठा करण्यात येणार होता. इचलकरंजी येथे अतिवृष्टीमुळे कारखान्यातमध्ये 3 फुट पाणी साचले होते.

मा.सभापती : मी सूचना दिलेल्या आहेत. शाळेच्या पहिल्या दिवशी गणवेश देण्यात यावे. येत्या शैक्षणिक वर्षात गणवेश, बुट शाळा सुरू होण्याच्या दिवशीच वितरीत करावेत. प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन 2006-2007 या शैक्षणिक वर्षाकरीता मनपा शालेय विद्यार्थ्यांना रेक्झीन शुज, कॅनव्हॉस शुज, पांढरे व रंगीत पायमोजे आणि नेकटाय पुरविण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक तक्त्यानुसार रेक्झीन शुज व कॅनव्हॉस शुज या साहित्यासाठी **मे.अभय ट्रेडर्स** यांचे सर्वात कमी दराची निविदा व पांढरे व रंगीत पायमोजे तसेच नेकटाय या साहित्यासाठी **मे.रोशन सेल्स कॉर्पोरेशन** यांची सर्वात कमी दराची निविदा स्विकारणेस तसेच याकरीता लागणाऱ्या रक्कम रूपये 29 लक्षच्या अपेक्षीत खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते मान्यता देण्यात येते. अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा वाढीव खर्चामुळे रूपये 5 लक्ष अतिरिक्त वाढीव तरतुद करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.92 :**

कार्यकारी अभियंता (विड्रेइ व उ) औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.आंबेडकरनगर एन-6 सिडको, येथील स्मशानभूमी लगत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या रेखांकनातील संपादीत करण्यात येणाऱ्या भूखंड क्र.J-1/1 व भूखंड क्रमांक J-1/2 (एकत्रित क्षेत्र 1272 चौ.मी.) या जागेस संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरीता सा.बां.विभागाचे सन 2005-06 च्या दरसूचीनुसार र.रू.5,94,700/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून सदरील खर्च भूखंडांचे संरक्षण या लेखाशिर्षातून करण्यात येईल. करीता सदरील कामासाठी र.रू.5,94,700/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

मा. सभापती : प्रस्ताव मंजूर करण्यात येतो. ठराव क्र.87 अन्वये मंजुरी दिल्यानुसार सदरची जागा संपादीत केल्यानंतर या जागेवर अतिक्रमण होऊ नये याकरीता तातडीने संरक्षीत भिंत

बांधण्याचे काम हाती घेण्यात यावे. त्यासाठी कलम 5(2)(2) अन्वये सदरचे काम उपलब्ध गुत्तेदाराकडून तात्काळ करून घेण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.आंबेडकरनगर एन-6 सिडको, येथील स्मशानभूमी लगत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या रेखांकनातील संपादीत करण्यात येणाऱ्या भूखंड क्र.J-1/1 व भूखंड क्रमांक J-1/2 (एकत्रित क्षेत्र 1272 चौ.मी.) या जागेस संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र.रू.5,94,700/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच मनपाने संपादीत केलेल्या जागेवर अतिक्रमण होऊ नये याकरीता तातडीने संरक्षीत भिंत बांधण्याचे काम हाती घेण्यात यावे. मुं.प्रां.मनपा अधि.1949 चे कलम 5(2)(2) अन्वये सदरचे काम उपलब्ध गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.93 :**

(दि.16-8-06 च्या सभेतील स्थगित ठेवण्यात आलेला विषय क्र.68 )

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजना, जायकवाडी ते बी.पी.टी. दरम्यान 1200 मीमी व्यासाची उध्दरणवाहिनीवर 1200 मीमी व्यासाचे बटरफ्लाय व्हॉल्व पुरविणे, बसविणे चा प्रस्ताव सादर केला आहे. सदर कामाचा र.रू.12,13,100/- किंमतीचा प्रस्ताव मा.आयुक्तांचे मान्यतेनंतर मा.स्थायी समितीपुढे सादर करण्यात आला होता.

सदरचे कामामध्ये औरंगाबाद पाणी पुरवठा योजना अंतर्गत पिंपळवाडी बंड व टाकळीफाटा येथे 1200 मीमी व्यासाचे जुने बटरफ्लाय व्हॉल्व बदलून नविन बसविणे व अनुषंगीक बाबी अंतर्भूत आहेत. कारण सध्याचे व्हॉल्व नादुरूस्त आहेत व यामुळे जलवाहिनीवर काम निघाल्यास बी.पी.टी. ते जायकवाडी पर्यंत जी वाहिनी रिकामी करावी लागते ते टाळून सेक्शनिंगमुळे पाण्याचा अपव्यय होणार नाही व पाणी पुरवठा सुरळीत ठेवणे व दैनंदिन देखभालीसाठी याचा उपयोग होणार आहे.

मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीनंतर सदर कामाच्या निविदा दि.10.2.2006 रोजी प्रसिध्द झाल्यावर, खालील निविदा धारकांचे देकार प्राप्त झाले.

| | |
|---|---|
| 1. मे.एल.के.कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 41% जास्त |
| 2. रेणुका इलेक्ट्रीक कं. | अं.प.दरापेक्षा 44% जास्त |
| 3. पॅटसन व्हॉल्व | अं.प.दरापेक्षा 45% जास्त |
| 4. एजाज अहमद | अं.प.दरापेक्षा 55% जास्त |
| 5. सेठ अँड सुरा | अं.प.दरापेक्षा 48% जास्त |

उपरोक्तपैकी मे.एल.के.कन्स्ट्रक्शन यांचे दर कमी असल्यामुळे त्यांना दर पृथःकरणासह वाटाघाटीस बोलावले असता, त्यांनी दर पृथःकरण सादर केले. पुनः आय.व्ही.सी. कंपनीला पत्र देऊन व्हॉल्व पुरविण्याचे सर्व करासह दर मागवून तुलनात्मकदृष्ट्या अभ्यास करता मे.एल.के.कन्स्ट्रक्शन यांचे दरास मा.आयुक्तांनी 41% जास्तीच्या दरास मंजुरी देऊन वाढीव रक्कम रू.17,10,393/- किंमतीचे अंदाजपत्रकाच्या मान्यतेसाठी शिफारस केली आहे. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.मो.जावेद मो.इसाक : दि.१६-८-२००६ च्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तातील विषय क्र.६८ मध्ये एल.के.कन्स्ट्रक्शन यांना काम दिलेले आहे. या संदर्भात त्यांचेवर गुन्हा दाखल केलेला नाही, चौकशी चालू आहे. करीता त्यांना काम देण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता द्यावी.

मा. सभापती : स.सदस्यांचे म्हणण्यानुसार एल.के.कन्स्ट्रक्शन या एजन्सीवर फक्त तक्रार दाखल झाली असेल व त्यांच्यावर लावण्यात आलेले आरोप सिध्द झालेले नसतील तर मा.न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून त्यांना काम देण्यास हरकत नाही. दि.१६-८-०६ च्या सभेतील स्थगित ठेवलेला प्रस्ताव क्र.६८ ला मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजना, जायकवाडी ते बी.पी.टी. दरम्यान 1200 मीमी व्यासाची उध्दरणवाहिनीवर 1200 मीमी व्यासाचे बटरफ्लाय व्हॉल्व पुरविणे, बसविणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 41% जास्त दराची मे.एल.के.कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद